महाराष्ट्र शासन

पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.

चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -411008

दुरध्वनी क्रमांक-020- 25657878 फॅक्स क्रमांक-020-25674641

ई मेल- sp.pune.r @maha.gov.in.



जा.क्र. आशा-१/प्रलि/पोशि-नियुक्ती/पो.भरती-२०२१/२०२६/ पुणे दिनांक :- /०२/२०२६.

संदर्भ :- १. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १२ अन्वये

२. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र.खेआ/पोलीस/प्र.प./ २२-२३/का-१५/८८८, दिनांक २७.५.२०२३

३. या कार्यालयाचे दिनांक ०८.०७.२०२३ रोजी अपात्र केल्याबाबतचे पात्र

४. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारण, मुंबई यांच्याकडे याचिका दाखल दि. २९.४.२०२५

५. मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचा निकाल दिनांक ५.१.२०२६

विषय :- **पोलीस शिपाई भरती-२०२१**

पोलीस शिपाई पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नेमणूकीबाबत...

-----000-----

आ दे श :-

पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील सन २०२१ मधील रिक्त असलेल्या पोलीस शिपाई पदासाठी पोलीस भरती प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. सदर पोलीस भरती प्रक्रिये मध्ये खालील नमूद उमेदवारांची दरम्यान लेखी परीक्षा व मैदानी चाचणीमध्ये गुणानुक्रमे, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार निवड झालेली होती. परंतु त्यांचे खेळाडू प्रमाणपत्र पडताळणीसाठी पाठविले असता, त्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरल्याने त्यांना नियुक्ती देण्यात आलेली नाही, परंतु त्यांनी संदर्भ क्र.२ अन्वये खेळाडू प्रमाणपत्र अवैध ठरल्याने अपात्र करण्यात आल्याने त्यांनी संदर्भ क्र.४. अन्वये सदरच्या आदेशाविरुध्द मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे याचिका दाखल केलेली होती. संदर्भ क्र.५ अन्वये सदर याचिकेचा निकाल दिनांक ५.१.२०२६ रोजी लागला असून, त्यांनी खालील नमूद उमेदवारांचे खेळाचे प्रमाणपत्र पुनर्पडताळणी करुन त्यामध्ये सदरचा खेळडू प्रमाणपत्र वैध ठरल्यास त्यांना नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

त्यानुसार पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेल्या खालील नमूद उमेदवारांची खेळाडू प्रमाणपत्र पुर्नपडताळणी दिनांक २३.१.२०२६ रोजी वैध ठरल्याने तसेच, उमेदवारांची कागदपत्र पडताळणी, वैद्यकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी झाली असून ते पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देणेसाठी पात्र ठरलेले आहेत.

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, भाग-१ मधील नियम क्रमांक ६३ मध्ये दिलेल्या अधिकारानुसार खालील नमूद उमेदवार यांना पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर **"पोलीस शिपाई" गट-क** या संवर्गात सुधारित वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-७ रुपये २१७००-६९१०० मधील वेतन रुपये २१७००/- या प्रारंभिक वेतनावर (विशेष वेतन रुपये ७५०/- व अधिक नियमानुसार देय असणारे भत्ते याप्रमाणे) दि. /०२/२०२६ पासून खालील नमूद अटी व शर्थींचे अधीन राहून **अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती** देण्यात येत आहे.

अ.क्र.	चेस्ट क्रमांक	उमेदवाराचे नांव	लिंग	जात प्रवर्ग	निवड प्रवर्ग	समांतर आरक्षण
१	४५५१५	शितल दत्ता वाघमोडे	महिला	अ.जा	अ.जा	खेळाडू
२.	४५५१६	पुजा जालिंदर वाघमारे	महिला	अ.जा	अ.जा	खेळाडू

अटी व शर्ती :

१. पोलीस शिपाई या पदावर नियुक्ती अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील. शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सूचना न देता केव्हाही सेवेतुन सेवामुक्त करण्यात येईल.

२. पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली १९५९ भाग-१ मधील नियम क्रमांक ७८(१)(i) ते (viii) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्याची तरतुद आहे अथवा मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार सेवा समाप्त करण्यात येईल.

३. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १२ अन्वये नवप्रविष्ट पोलीस शिपाई पदासाठी विहित केलेले मुलभूत प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक राहील. सदर प्रशिक्षणांती घेण्यात येणारी परीक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर चार संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत कालावधीत त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-२०११/ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,दि.१२/१२/२०११ अन्वये मागासवर्गीय उमेदवारांना जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहून निव्वळ तात्पुरती स्वरुपात नियुक्ती करण्यात आली आहे.

५. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे बंधनकारक राहील. अशा उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठीचा प्रस्ताव संबधित जात पडताळणी समितीकडे या कार्यालयामार्फत सादर करुन जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकित प्रत न चुकता तात्काळ या कार्यालयातील आस्थापना शाखा येथे सादर करणे बंधनकारक राहील.

६. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांचे पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीबाबत शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दिनांक १८.०५.२०१३ नुसार मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचा-यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास कार्यवाही बाबत नमूद केले आहे. (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० हा कायदा दिनांक १८.१०.२००१ पासून अंमलात आला आहे. यातील कलम ६ नुसार शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या प्रत्येक मागासवर्गीय कर्मचा-याने, आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता, संबधित जात पडताळणी समितीकडून तपासून घेणे आवश्यक आहे. यातील कलम १० च्या तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग या प्रवर्गात मोडत नसलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीने जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन, मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्ती मिळविली असेल तर ती व्यक्ती सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र. २३/९३/अकरा/मंत्रालय मुंबई, दिनांक १२.१०.१९९३ नुसार सेवेतून तात्काळ सेवामुक्त करण्यास पात्र ठरेल. आणि अशा व्यक्तीने घेतलेले अन्य कोणतेही लाभ काढून घेतले जाण्यास सुध्दा पात्र ठरेल.

७. याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.

८. पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात कधीही उमेदवारांच्या चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकुल फेर अहवाल प्राप्त झाल्यास अथवा त्याबाबत काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास तसेच उमेदवाराने स्वहस्ताक्षरात भरुन दिलेल्या साक्षांकन नमुना फॉर्ममध्ये भरुन दिलेली माहिती खोटी/चुकीची दिल्याचे निदर्शनास आल्यास त्यांना कोणतीही पुर्व सूचना न देता त्यांची सेवा संपुष्टात आणली जाईल. त्याबाबत आपणास कोणतीही तक्रार अथवा दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

९. पोलीस शिपाई पदावर आपणास नेमणूक दिल्यानंतर आपण पोलीस भरती होणेसाठी गैरमार्गाचा, अवैध बाबींचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व त्याबाबत आपणास कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही. तसेच त्याबाबत उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१०. उमेदवारास प्रशिक्षण काळात कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. प्रशिक्षण कालावधीत उमेदवाराचा दोष आढळल्यास किंवा उमेदवाराची वर्तणूक गैरशिस्तीची आढळून आल्यास, कोणतेही बेशिस्त गैरवर्तन किंवा नितिमुल्यांचा -हास करणारे अशोभनीय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरीष्ठ अधिका-यांच्या पूर्व परवानगीशिवाय गैरहजर आढळल्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना/नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

११. पोलीस दलातील नोकरीबाबतची पात्रता व योग्यता आजमाविण्यासाठी पोलीस प्रशिक्षण विद्यालयात आपली मानसिक चाचणी घेण्यात येईल. या मानसिक चाचणीत आपण अपात्र ठरल्यास आपणास सेवामुक्त करण्यात येईल.

१२. प्रशिक्षण कालावधीत उमेदवारास कोणत्याही प्रकारची इजा किंवा दुखापत झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही किंवा उमेदवाराला कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

१३. महाराष्ट्र शासन, गृहविभाग पत्र क्रमांक पीएसबी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५अ, दिनांक २६.०९.२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक प्रशि/पोशि भरती/प्रशि खर्च वसुली/२०१२/२२३१, दिनांक २६.०४.२०१२ अन्वयें पोलीस शिपाई पदामध्ये नियुक्ती दिलेल्या कर्मचारी यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ३ वर्षात पोलीस शिपाई पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवारांकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवाराने जितक्या महिने प्रशिक्षण घेतले आहे त्या प्रशिक्षणाचा खर्च म्हणून प्रती महिना रुपये २०००/- (प्रती मासिक रुपये दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसूल करण्यात येईल, व सदरची रोख रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे आपणास बंधनकारक राहील.

१४. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दिनांक २/१२/१९९७ अन्वये धारण केलेल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास राजीनामा देण्यासंबंधी नियुक्ती प्राधिका-यास एक महिन्याची पूर्व सूचना किंवा पूर्व सुचनेऐवजी एक महिन्याचे वेतन वसुल करण्यात येईल. तसेच नियुक्ती स्विकारलेनंतर पदाचा राजीनामा दिल्यास पुर्ननियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

१५. महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्र.२०७ अन्वये पोलीस शिपाई पदासाठी हिंदी बोली भाषा स्तर ही परिक्षा उत्तीर्ण होण्याची अट विहीत केली असून नमूद उमेदवार हे शालांत परिक्षेमध्ये हिंदी विषय घेऊन उत्तीर्ण झाले असल्यास त्यांना हिंदी भाषेची परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात येईल. तसेच नमूद उमेदवाराची मायबोली मराठी असल्याने त्यांना सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक म.भा.प- १०८७/१४/सीआर-२/८७/२० दि.३०.१२.८७ व महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग १ मधील नियम क्र.१९९ अन्वये मराठी भाषेची परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यात येईल. पोलीस शिपाई भरती सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वयें पोलीस शिपाई पदावर नेमणूक झालेल्या उमेदवारास मराठी व हिंदी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर, त्या उमेदवारास हिंदी व मराठी भाषा परीक्षा ह्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

१६. शासन निर्णय गृह विभाग क्रमांक संकीर्ण -१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब दिनांक २६/१०/२०१७ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम ३ (२) उपखंड (अ) तरतुदीमधील सुधारणा नुसार पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दर्जापर्यंतच्या पोलीस कर्मचा-यांच्या घटक आस्थापना बदली नियमावली मधील अटींच्या पूर्ततेनुसार विनंती असल्यास घटक बदलीबाबत पात्र समजण्यात येईल.

१७. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२.०६.२०१४ अन्वयें पोलीस शिपाई पदावरील नियुक्तीद्वारे प्रथम सेवा प्रवेशाच्या वेळी, नियुक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत त्यांची स्वत:ची मत्ता व दायित्व विवरणे (अ) अचल मालमत्तेचे विवरण (ब) चल मालमत्तेचे विवरण (क) कर्जे व इतर दायित्वे याबद्दल विवरण स्वत:हून भरुन संबधित नेमणूकीच्या आस्थापनेस सादर करण्याची आहेत.

१८. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये दिनांक ०१ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेतील नियुक्तीनंतर नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना अंतर्गत नव्याने विहित करण्यात आलेली राष्ट्रीय निवृत्ती योजना (एनपीएस) लागू राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४, दिनांक ३१/०३/२०२३ अन्वये नमुना-१ प्रमाणे कुटुंबाचा तपशिलाचे हमीपत्र व नमुना-२ प्रमाणे सेवेत असताना शासकीय कर्मचारी विकलांगतेमुळे शासकीय सेवेकरीता असमर्थ ठरल्यास/मृत्यू पावल्यास/त्याला अनुज्ञेय लाभ देण्याबाबतचा विकल्प देणे बंधनकारक राहील.

१९. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ नियम १३ नुसार नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपाई यांना मुंबई पोलीस म्यॅन्युअल १९५९, मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ व मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम आणि तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागू होतील.

२०. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ (सुधारणा) नियम २०१६ मधील नियम ३(१)(ड) नुसार व मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. सदर परवाना धारण न केलेने उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत परवाना धारण करणे आवश्यक आहे, त्या कालावधीत परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल.

२१. पोलीस शिपाई पदी नियुक्ती झाल्यावर पोलीस विभागातील वाहन चालकाचे कर्तव्य बजावणे बंधनकारक राहिल. तसेच सक्षम प्राधिका-याने वाहन चालकाच्या कर्तव्याच्या अनुषंगाने वेळोवेळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील.

२२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ (सुधारणा) नियम २०१६ मधील नियम १३ अन्वयें पोलीस शिपाई पदावरील नियुक्तीच्या वेळी शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळी धारण करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय सा.प्र.वि.क्रमं ाक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/०३/२००३ अन्वयें नियुक्तीवेळी सदर संगणक अर्हता धारण केली नसल्यास नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सदर संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक २८.०५.२०१८ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

२३. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरएन-२०००/प्र.क्र./१७/२०००/१२, दिनांक ०१.०७.२००५ अन्वयें महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील विहित अटी व तरतुदीनुसार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रतिज्ञापन नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर सेवेत राहण्यास अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील यांची नोंद घ्यावी.

२४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या.१२, दि.२८/०५/२०१८ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२, मधील नियम ४(२)(अ) नुसार नमूद उमेदवार यांनी सदर नियुक्ती आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत रुजू होणे बंधनकारक आहे. तदनंतर शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१८/व्ही.आय. पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या.१२, दि.२६/०९/२०१८ अन्वयें ३० दिवसाचा विहित कालावधी संपल्यानंतर, अपवादात्मक परिस्थितीत रुजू होण्यास मुदतवाढ द्यावयाची झाल्यास, सदर नियमानुसार संबधित उमेदवारास स्वविवेकानुसार रुजू होण्यास केवळ एक महिन्याचा वाढीव कालावधी देता येईल. तदनंतर देण्यात येणा-या कोणत्याही कारणाचा/विनंतीचा विचार करण्यात येणार नाही व नोकरीची संधी गमवावी लागेल.

२५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक पोमसं/६/१०/पोशि/भरती/सेवाजेष्ठता/२५१/२०१२, दिनांक १७.०८.२०१३, स्थायी आदेश क्रमांक २२१३ मधील तरतुदीनुसार सेवाजेष्ठता निश्चित करण्यात येईल.

२६. नियुक्ती आदेशामधील जे उमेदवार सध्या शासकीय/निमशासकीय सेवेत इतर ठिकाणी कार्यरत असतील अशा उमेदवारांनी पोलीस शिपाई भरतीसाठी भरलेल्या आवेदन अर्जानुसार संबंधित कार्यालयाची परवानगी घेतलेली असावी. तसेच पूर्वीच्या सेवेचा राजीनामा मंजुरीबाबतचे आदेश किंवा कार्यमुक्तीचे आदेश कर्तव्यावर हजर होणेपूर्वी या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

२७. महाराष्ट्र शासन वित्त विभाग राजपत्र भाग-४ अ, दि.३०/१२/२०२१ मधील महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम २०२१ मधील तरतुदीनुसार जन्म तारीख अचूक असल्याबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्यानुसार एकदा केलेल्या जन्म तारखेच्या नोंदीमध्ये बदल करण्याची विनंती स्विकारली जाणार नाही.

२८. महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दि.२२/११/२०२१ अन्वये शासकीय सेवेत नव्याने नियुक्ती झाल्यानंतर किंवा अन्य प्रकारे वेतननिश्चिती/वेतनवाढी/अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या/प्रदानाच्या अनुषंगाने संपूर्ण सेवा कालावधीत नियमानुसार अथवा कायदयानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसताना अतिरिक्त रक्कम प्रदान झाल्याची बाब सद्य:स्थितीत/भविष्यात शासनाच्या निदर्शयास आल्यास अशी अतिप्रदानाची रक्कम शासनास परत करण्याचे लेखी वचनपत्र देणे बंधनकारक राहील.

२९. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.रप्रस-१११४/प्र.क्र.११/सेवा-५, दि.१० जुन २०१५ अन्वये लेखी स्वग्राम घोषणापत्र तसेच महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-१ नियम २४५ नुसार भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ रहाण्याबाबत शपथ/प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील.

३०. पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर उमेदवारास उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परीक्षा द्यावयाची असल्यास त्या परीक्षेस बसण्यासाठी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

३१. अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती या प्रवर्गातील महिला उमेदवार वगळून इतर प्रवर्गातून निवड झालेल्या महिला उमेदावारांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र तपासणीकरीता संबंधित विभागीय आयुक्त यांचेकडे पाठविण्यात येणार असून सदर नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र तपासणीच्या अधिन राहून महिला उमेदवार यांना तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

३२. नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपाई यांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा आणि अपिले) १९५६, सेवेच्या सर्वसाधारण शर्थी, रजा, सेवानिवृत्ती इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम त्यामधील सुधारणा, तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकामधील विहित केलेले अन्य नियम व तरतुदी तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश परिपत्रके लागू राहतील.

३३. महिला उमेदवारांबाबत प्रसुती रजे संदर्भात महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक प्ररजा २०१५/ प्र.क्र.२५/सेवा-६, दिनांक १५.०१.२०१६ मधील तरतुदी व शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश व रजा नियम लागू राहतील.

३४. पोलीस शिपाई पदावर नेमणूक दिल्यानंतर आपण पोलीस भरती होण्यासाठी गैरमार्गाचा, अवैद्य बाबींचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व त्याबाबत आपणास कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही. तसेच त्याबाबत उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३५. पोलीस शिपाई पदावर नेमणूक दिल्यानंतर पोलीस भरती होण्यासाठी गैरमार्गाचा, अवैद्य बाबींचा अवलंब (चारित्र्य पडताळणी, शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचा दाखला, जात पडताळणी (वैधता), डोमीसाईल, नॉन क्रिमीलेअर, पोलीस पाल्य, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, माजी सैनिक, गृहरक्षक, अनाथ, महिला आरक्षण इ. प्रमाणपत्रे व पोलीस भरतीसाठी सादर केलेली इतर कागदपत्रे/प्रमाणपत्रे ही खोटी/बनावट आढळून आल्यास तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवणे अथवा खोटी माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास) केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व त्याबाबत आपणास कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

(संदीप सिंह गिल्ल)भा.पो.से
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

प्रति,

१. पुजा जालिंदर वाघमारे, मु.पो. कुपवाड, ता. मिरज, जि सांगली पिन कोड-४१६४३६
२. शितल दत्ता वाघमोडे, मु.पो. सांबरवाडी कुपवाड, ता मिरज, जि सांगली
३.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण

२/- सदर आदेशामधील नमूद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई उमेद्वार यांना पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण येथे हजर करुन घेवून त्यांची नोंद आपले हजेरीपटावर घेण्यात यावी. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना सर्व किटसरंजाम, किट पेटीसह अदा करण्यात यावा. तसेच त्यांचेकडून राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडून खाते क्रमांक वेतन आकारणीसाठी लेखा शाखेस देण्यात यावा. तसेच हजर झालेबाबतची दिनांकासह माहिती आस्थापना शाखा व लेखाशाखेस तात्काळ कळविण्यात यावी.

२. प्रमुख लिपीक, लेखाशाखा (दोन प्रतीत)

२/- उक्त प्रमाणे नव्याने नियुक्ती दिलेले पोलीस शिपाई अंमलदार यांना शासकीय सेवेत नियुक्ती झालेने नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतंर्गत नव्याने विहित करण्यात आलेली राष्ट्रीय निवृत्ती योजना (एनपीएस) मधील विहित नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. तसेच त्यांचेकडून बँक खाते क्रमांक प्राप्त करुन घेऊन प्रचलित नियमानुसार नियमित वेतन व भत्त्यांची आकारणी करण्यात यावी.

३. जिल्हा पोलीस प्रसिध्दपत्रक (प्रसिध्दीसाठी)
४. प्रभारी अधिकारी, सायबर शाखा, पुणे ग्रामीण

२/- वरील प्रमाणे नियुक्ती आदेशाची समज सर्व उमेदवारांना फोनद्वारे तसेच एसएमएसद्वारे दयावी तसेच ई-मेलद्वारे प्रत पाठविणेत यावी.

* सूचनापत्र *

पोलीस शिपाई पदी नियुक्ती आदेश देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी सुचना.

१) नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मेस करीता रु.५०००/- अॅडव्हान्स भरणे आवश्यक असल्याने, सदरची रक्कम येताना बरोबर आणावी.

२) हजर होणा-या उमेदवारांनी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा. गरजेनुसार आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, बाड-बिस्तारा, जेवणासाठी ताट, वाटी, तांब्या तसेच बादली, मग वगैरे साहित्य बरोबर आणावे.

३) बँक खाते, डीसीसपीएस/एनपीएस खाते व सेवापट उघडणेसाठी 30x30 एमएम या साईजचे स्वत:चे ६ फोटो, मुळ पॅन कार्ड व आधार कार्ड सोबत आणावे.
